"गोड मुलांनो - आत्म्याला सतोप्रधान बनविण्याची काळजी घ्या, कोणतीही खामी (दोष) राहू देऊ नका, मायेमुळे कोणती चूक होऊ नये"

प्रश्नः- तुम्हा मुलांच्या मुखावाटे नेहमी कोणते शुभ बोल निघाले पाहिजेत?

उत्तरः- नेहमी मुखातून हेच शुभ बोल बोला की आम्ही नरापासून नारायण बनणार, कमी नाही. आम्हीच विश्वाचे मालक होतो, पुन्हा बनणार. परंतु हे ध्येय फार उच्च आहे, त्यामुळे अतिशय सावध रहायचे आहे. आपला पोतामेल पाहायचा आहे. एम ऑब्जेक्टला समोर ठेवून पुरुषार्थ करत रहायचे आहे, हार्ट फेल (निराश) व्हायचे नाही.

ओम् शांती. बाबा बसून रूहानी मुलांना समजावून सांगत आहेत - इथे जेव्हा आठवणीच्या यात्रेमध्ये बसता तर भाऊ-बहिणींना सांगा की, तुम्ही आत्म-अभिमानी होऊन बसा आणि बाबांची आठवण करा. ही आठवण करून दिली पाहिजे. तुम्हाला आता ही स्मृती मिळत आहे. आम्ही आत्मे आहोत, आमचे बाबा आम्हाला शिकवण्यासाठी येतात. आम्ही देखील कर्मेंद्रियांद्वारे शिकतो. बाबा देखील कर्मेंद्रियांचा आधार घेऊन यांच्याद्वारे सर्वात पहिले हेच सांगतात की - 'बाबांची आठवण करा'. मुलांना सांगितले गेले आहे की हा आहे ज्ञान मार्ग. भक्तिमार्ग म्हणता येत नाही. ज्ञान केवळ एकच ज्ञान सागर पतित-पावन देतात. तुम्हाला पहिल्या नंबरचा पाठ हाच मिळतो की, 'स्वतःला आत्मा समजून बाबांची आठवण करा'. हे खूप जरुरी आहे. इतर कोणत्याही सत्संगामध्ये असे कोणाला बोलताही येणार नाही. भले आजकाल आर्टिफिशियल संस्था खूप निघाल्या आहेत. तुमचे ऐकून इतर कोणी असे म्हणतील देखील परंतु त्यांना त्याचा अर्थ समजणार नाही. समजावून सांगण्याची कला येणार नाही. हे तुम्हालाच बाबा सांगतात की बेहदच्या बाबांची आठवण करा तर विकर्म विनाश होतील. विवेक देखील म्हणतो ही जुनी दुनिया आहे. नवीन दुनिया आणि जुन्या दुनियेमध्ये खूप फरक आहे. ती आहे पावन दुनिया, ही आहे पतित दुनिया. बोलावतात देखील - 'हे पतित-पावन या, येऊन पावन बनवा'. गीतेमध्ये देखील शब्द आहेत मामेकम् (मज एकाची) आठवण करा. देहाच्या सर्व नात्यांचा त्याग करून स्वतःला आत्मा समजा. ही देहाची नाती अगोदर नव्हती. तुम्ही आत्मा इथे येता पार्ट बजावण्याकरिता. गायन देखील आहे - 'एकटे आलो, एकटे जायचे आहे'. याचा अर्थ मनुष्य समजत नाहीत. आता तुम्ही प्रॅक्टिकलमध्ये जाणता. आपण आता पावन बनत आहोत आठवणीच्या यात्रेद्वारे किंवा आठवणीच्या बळा द्वारे. हे आहेच राजयोगाचे बळ. तो आहे हठयोग, ज्याद्वारे मनुष्य थोड्या वेळासाठी निरोगी राहतात. सतयुगामध्ये तुम्ही किती निरोगी राहता. हठयोगाची गरज नाही. हे सर्व इथे या छी-छी (विकारी) दुनियेमध्ये करतात. ही आहेच जुनी दुनिया. सतयुग नवीन दुनिया जी आधी होऊन गेली आहे, तिथे या लक्ष्मी-नारायणाचे राज्य होते. हे कोणालाच ठाऊक नाहीये. तिथे प्रत्येक गोष्ट नवीन आहे. गाणे देखील आहे ना - 'जाग सजनिया जाग...' नवयुग आहे सतयुग. जुने युग आहे कलियुग. आता याला कोणीही सतयुग तर म्हणणार नाहीत. आता कलियुग आहे, तुम्ही सतयुगासाठी शिकत आहात. असे शिकवणारा तर कोणीही नसेल जो म्हणेल की, या शिक्षणाद्वारे तुम्हाला नवीन दुनियेमध्ये राज्य पद मिळेल. बाबांव्यतिरिक्त इतर कोणीही असे बोलू शकणार नाही. तुम्हा मुलांना प्रत्येक गोष्टीची आठवण करून दिली जाते. कोणतीही चूक करायची नाही. बाबा सर्वांना समजावून सांगत राहतात. कुठेही बसा, धंदा इत्यादी करा स्वतःला आत्मा समजून करा. काम-धंद्यामध्ये असताना जरा मुश्किल होते तर जितके शक्य होईल - वेळ काढून आठवणीमध्ये बसा तेव्हाच आत्मा पवित्र बनेल. दुसरा कोणताही उपाय नाही. तुम्ही राजयोग शिकत आहात नवीन दुनियेकरिता. तिथे आइरन एजेड आत्मा जाऊ शकत नाही. मायेने आत्म्याचे पंख तोडून टाकले आहेत. आत्मा उडते ना. एक शरीर सोडून दुसरे घेते. आत्मा आहे सर्वात वेगवान रॉकेट. तुम्हा मुलांना या नवीन गोष्टी ऐकून आश्चर्य वाटते. आत्मा किती छोटे रॉकेट आहे. त्यामध्ये ८४ जन्मांचा पार्ट नोंदलेला आहे. अशा गोष्टी मनामध्ये लक्षात ठेवल्याने उत्साह येईल. स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या बुद्धीमध्ये अभ्यासच लक्षात राहतो ना. तुमच्या बुद्धीमध्ये आता काय आहे? बुद्धी काही शरीरामध्ये नाहीये. आत्म्यामध्येच मन-बुद्धी आहे. आत्माच शिकते. नोकरी इत्यादी सर्व काही आत्माच करते. शिवबाबा देखील आत्मा आहेत. परंतु त्यांना 'परम' म्हटले

जाते. ते ज्ञानाचा सागर आहेत. ते अतिशय छोटा बिंदू आहेत. हे देखील कोणाला माहित नाही आहे, जे त्या बाबांमध्ये संस्कार आहेत तेच तुम्हा मुलांमध्ये भरले जातात. आता तुम्ही योग-बलाद्वारे पावन बनत आहात. त्यासाठी पुरुषार्थ करावा लागेल. शिक्षणामध्ये काळजी तर वाटते की कुठे आपण नापास होऊ नये. यामध्ये पहिल्या नंबरचा सब्जेक्टच हा आहे की आपण आत्म्याने सतोप्रधान बनावे. कोणती खामी (दोष) राहू नये. नाहीतर नापास होऊ. माया तुम्हाला प्रत्येक गोष्ट विसरायला लावते. आत्म्याला वाटते देखील की, चार्ट ठेवावा. पूर्ण दिवसभरामध्ये कोणते आसुरी कार्य करू नये. परंतु माया चार्ट ठेवू देत नाही. तुम्ही मायेच्या तावडीत सापडता. मन म्हणते देखील - पोतामेल ठेवावा. व्यापारी लोक नेहमी नफ्या-तोट्याचा पोतामेल (हिशोब) ठेवतात. तुमचा तर हा खूप मोठा पोतामेल (हिशोब) आहे. २१ जन्मांची कमाई आहे, यामध्ये चुक करता कामा नये. मुले खूप चुका करतात. या बाबांना तर तुम्ही मुले सूक्ष्मवतनमध्ये, स्वर्गामध्ये देखील बघता. बाबा (ब्रह्मा बाबा) देखील खूप पुरुषार्थ करतात. आश्चर्यचकित देखील होत असतात. बाबांच्या आठवणीमध्ये स्नान करतो, भोजन खातो, तरीही विसरून जातो आणि पुन्हा आठवण करू लागतो. मोठा सब्जेक्ट हा आहे. या गोष्टीमध्ये कोणताही मतभेद होऊ शकत नाही. गीतेमध्ये देखील आहे - देहा सहित देहाचे सर्व संबंध सोडा. बाकी राहिली आत्मा. देहाला विसरून स्वतःला आत्मा समजा. आत्माच पतित तमोप्रधान बनली आहे. मनुष्य मग म्हणतात - आत्मा निर्लेप आहे. आत्मा सो परमात्मा, सो आत्मा आहे; म्हणून समजतात की आत्म्याला कोणता लेप-छेप लागत नाही (कर्माचा प्रभाव पडत नाही). तमोगुणी मनुष्य शिकवण देखील तमोगुणी देतात. सतोगुणी बनवू शकत नाहीत. भक्तिमार्गामध्ये तमोप्रधान बनायचेच आहे. प्रत्येक वस्तू पहिले सतोप्रधान मग सतो रजो तमोमध्ये येते. कन्स्ट्रक्शन आणि डिस्ट्रक्शन होते (निर्मिती आणि विनाश होतो). बाबा नवीन दुनियेचे कन्स्ट्रक्शन (निर्मिती) करतात मग या जुन्या दुनियेचे डिस्ट्रक्शन होते (विनाश होतो). भगवान तर नवीन दुनिया रचणारे आहेत. ही जुनी दुनिया बदलून नवीन होईल. नवीन दुनियेची खूण तर हे लक्ष्मी-नारायण आहेत ना. हे नवीन दुनियेचे मालक आहेत. त्रेताला देखील नवीन दुनिया म्हणता येणार नाही. कलियुगाला जुनी, सतयुगाला नवीन म्हटले जाते. कलियुगाचा अंत आणि सतयुगाची आदि यांच्या मधील हे आहे संगमयुग. कोणी एम.ए., बी.ए. शिकतात तर उच्च पदाधिकारी बनतात ना. तुम्ही या शिक्षणाने किती श्रेष्ठ बनता. दुनिया या गोष्टीला जाणत नाही की यांना इतके श्रेष्ठ कोणी बनवले. तुम्ही आता आदि-मध्य-अंताला जाणले आहे. सर्वांच्या जीवन कहाणीला तुम्ही जाणता. हे आहे नॉलेज. भक्तिमार्गामध्ये नॉलेज नाही आहे फक्त कर्मकांड शिकवतात. भक्तीचा विस्तार खूप आहे. किती वर्णन करतात. खूप सुंदर दिसते. बीजामध्ये कसले सौंदर्य आहे, इतके छोटे बीज किती मोठे होते. भक्तीचे हे झाड आहे, पुष्कळ कर्मकांड आहे. ज्ञानाचा घोट एकच आहे - मनमनाभव. बाबा म्हणतात - तमोप्रधानापासून सतोप्रधान बनण्याकरिता माझी आठवण करा. तुम्ही म्हणता देखील - 'हे पतित-पावन येऊन आम्हाला पावन बनवा'. रावण राज्यामध्ये सर्व पतित, दुःखी आहेत. राम राज्यामध्ये सर्व आहेत पावन, सुखी. राम राज्य, रावण राज्य नावे तर आहेत ना. तुम्हा मुलांव्यतिरिक्त राम-राज्याविषयी कोणालाच ठाऊक नाही आहे. तुम्ही आता पुरुषार्थ करत आहात. ८४ जन्मांचे रहस्य देखील तुमच्या शिवाय कोणीही जाणत नाहीत. फारफार तर एवढे म्हणतात - 'भगवानुवाच - मनमनाभव'. तर काय असे थोडेच कोणी सांगू शकतील की, तुम्ही ८४ जन्म कसे पूर्ण केले आहेत. आता चक्र पूर्ण होते. गीता ऐकविणाऱ्यांचे जाऊन ऐका - गीतेवर काय सांगतात. तुमच्या बुद्धीमध्ये तर आता संपूर्ण ज्ञान टपकत राहते. बाबा विचारतात - पहिले कधी भेटला होता? म्हणतात - हो बाबा, कल्पापूर्वी भेटलो होतो. बाबा विचारतात आणि तुम्ही अर्थ सहित उत्तर देता. असे नाही की पोपटा प्रमाणे बोलता. बाबा विचारतात - का भेटला होता, काय मिळवले होते? तर तुम्ही म्हणू शकता - आम्ही विश्वाचे राज्य मिळवले होते, त्यामध्ये सर्व काही येते. भले तुम्ही म्हणता नरापासून नारायण बनलो होतो परंतु विश्वाचे मालक बनणे, त्यामध्ये राजा-राणी आणि डीटी डिनायस्टी (दैवी कुळ) सर्व आहे. त्याचे मालक राजा, राणी, प्रजा सर्व बनतील. यालाच म्हटले जाते - शुभ बोलणे. आम्ही तर नरापासून नारायण बनणार, कमी नाही. बाबा म्हणतात - 'होय बाळांनो, पूर्णतः पुरुषार्थ करा'. आपला पोतामेल देखील पाहायचा आहे - या स्थितीमध्ये आपण उच्च पद मिळवू शकू की नाही? कितीजणांना रस्ता दाखवला आहे? आंधळ्यांची काठी बनलो आहे? जर सेवा करत नसाल तर समजले पाहिजे - आपण प्रजेमध्ये जाणार. आपल्या मनाला विचारायचे आहे जर आता आपले शरीर सुटले तर काय पद मिळेल? खूप मोठे ध्येय आहे तर सावध राहिले पाहिजे. बरीच मुले समजतात - खरोखर आपण तर आठवणच करत नाही तर मग पोतामेल ठेवून काय करणार. त्याला मग हार्ट फेल (हताश) म्हटले जाते. ते अभ्यास देखील असाच करतात. लक्ष देत नाहीत. मिया-मिट्ठू बनून बसून रहायचे नाही, नाहीतर शेवटी मग नापास व्हाल. आपले कल्याण करायचे आहे. एम ऑब्जेक्ट तर समोर आहे. आपल्याला शिकून हे बनायचे आहे. हे

देखील आश्चर्य आहे ना. कलियुगामध्ये तर राजाई नाही आहे. कलियुगामध्ये मग यांची राजाई कुठून येईल. सर्व काही अभ्यासावर अवलंबून आहे. असे नाही की देवतांचे आणि असुरांचे युद्ध झाले, देवतांनी जिंकून राज्य प्राप्त केले. आता असुरांचे आणि देवतांचे युद्ध कसे होऊ शकते. आणि ना कौरवांचे आणि पांडवांचे युद्ध झाले. युद्धाची कल्पनाच निषिद्ध आहे. पहिले तर हे सांगा की बाबा म्हणतात - देहाचे सर्व संबंध (नाती) सोडून स्वतःला आत्मा समजा. तुम्ही आत्मे अशरीरी आला होता, आता पुन्हा परत जायचे आहे. पवित्र आत्मेच परत जाऊ शकतील. तमोप्रधान आत्मे काही जाऊ शकणार नाहीत. आत्म्याचे पंख तुटले आहेत. मायेने पतित बनवले आहे. तमोप्रधान असल्या कारणाने इतक्या दूर पवित्र ठिकाणी जाऊ शकत नाहीत. आता तुमची आत्मा म्हणेल की, आम्ही खरे तर परमधामचे राहणारे आहोत. इथे हा ५ तत्वांचा पुतळा घेतला आहे - पार्ट बजावण्याकरिता. जेव्हा मृत्यू होतो तेव्हा म्हणतात - स्वर्गवासी झाला? कोण स्वर्गात गेले? तिथे शरीर गेले की आत्मा गेली? शरीर तर जळून गेले. बाकी राहिली आत्मा. ती स्वर्गामध्ये तर जाऊ शकत नाही. लोकांना तर ज्यांनी जे ऐकवले तेच बोलत राहतात. भक्तीमार्गवाल्यांनी तर भक्तीच शिकवली आहे, ऑक्युपेशन (देवतांच्या कार्याविषयी) तर कोणाला माहिती सुद्धा नाहीये. शिवाची पूजा सर्वात श्रेष्ठ म्हणतात. उच्च ते उच्च शिव आहेत, त्यांचीच आठवण करा, त्यांचेच चिंतन करा. माळा देखील देतात आणि म्हणतात - 'शिव-शिव' म्हणत माळा फिरवत रहा. अर्था शिवाय माळा घेऊन शिव-शिव म्हणत राहतील. गुरु लोक अनेक प्रकारचे शिक्षण देतात. इथे तर एकच गोष्ट आहे, बाबा स्वतः म्हणतात - 'माझी आठवण केल्याने विकर्म विनाश होतील'. मुखावाटे शिव-शिव म्हणायचे नाहीये. मुलगा थोडेच पित्याच्या नावाचा जप करतो. हे आहे सर्व गुप्त. कोणालाच ठाऊक नाहीये की तुम्ही काय करत आहात. ज्यांना कल्पापूर्वी समजले असेल तेच समजतील. नवीन मुले येत राहतात, वृद्धी होत राहते. पुढे चालून ड्रामा काय दाखवेल ते साक्षी होऊन पाहायचे आहे. अगोदरच बाबा साक्षात्कार घडवणार नाहीत की असे-असे होईल. मग तर आर्टिफिशियल (कृत्रिम ड्रामा) होईल. या खूप समजून घेण्यासारख्या गोष्टी आहेत. तुम्हाला समज (ज्ञान) मिळते, भक्तिमार्गामध्ये बेसमज (अज्ञानी) होतो. जाणता ड्रामामध्ये भक्तीची देखील नोंद आहे.

आता तुम्ही मुले समजता - आपण या जुन्या दुनियेमध्ये राहणारे नाही आहोत. स्टुडंटच्या बुद्धीमध्ये अभ्यास राहतो. तुम्हाला देखील मुख्य-मुख्य पॉईंट्स बुद्धीमध्ये धारण करायचे आहेत. पहिल्या नंबरची गोष्ट 'अल्फ' विषयी पक्के करा तेव्हाच पुढे जा. नाहीतर फालतू प्रश्न विचारत राहतील. मुली लिहितात की, 'अमक्याने लिहून दिले आहे की, गीतेचा भगवान शिव आहे'; हे तर अगदी बरोबर आहे. भले असे म्हणतात परंतु बुद्धीमध्ये काही बसते थोडेच. जर समजतील की बाबा आले आहेत तर म्हणतील - अशा बाबांना आम्ही जाऊन भेटणार. वारसा घेणार. एकाचाही निश्चय बसत नाही. लगेचच एकाचे सुद्धा पत्र येत नाही. फारफार तर एवढे लिहितात की, नॉलेज खूप चांगले आहे, परंतु इतकी हिंमत होत नाही जे समजतील - वाह! असे बाबा, ज्यांच्यापासून आपण इतका वेळ दूर राहिलो, भक्तिमार्गामध्ये खस्ता खाल्ल्या, आता ते बाबा विश्वाचा मालक बनविण्याकरता आले आहेत, तर धावत जावे. पुढे चालून असे निघतील. जर बाबांना ओळखले आहे, उच्च ते उच्च भगवान आहेत तर त्यांचे बना ना. असे स्पष्टीकरण दिले पाहिजे जे बुद्धीचे कपाटच उघडेल. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

१) धंदा इत्यादी करत असताना आत्म्याला पावन बनविण्याकरिता वेळ काढून आठवणीची मेहनत करायची आहे. कोणतेही आसुरी काम कधीही करायचे नाही.

२) आपले आणि इतरांचे कल्याण करायचे आहे. शिकायचे देखील आहे आणि शिकवायचे देखील आहे, मियाँ मिट्ठू बनायचे नाही. आठवणीचे बळ जमा करायचे आहे.

वरदान:- नावाच्या आणि मानाच्या त्यागा द्वारे सर्वांचे प्रेम प्राप्त करणारे विश्वाचे भाग्यविधाता भव

जसे बाबांना नावा-रूपा पासून न्यारा म्हटले जाते परंतु सर्वात जास्त नावांचे गायन बाबांचेच आहे, तसेच तुम्ही देखील अल्पकाळच्या नाव आणि मान या पासून न्यारे बना तर कायमसाठी सर्वांचे प्रिय स्वतःच बनाल. जे नावाच्या आणि मानाच्या भिकारीपणाचा त्याग करतात ते विश्वाचे भाग्य

विधाता बनतात. कर्माचे फळ तर स्वतः तुमच्या समोर संपन्न स्वरूपामध्ये येईल त्यामुळे अल्पकाळच्या इच्छा मात्रम् अविद्या बना. कच्चे फळ खाऊ नका, त्याचा त्याग करा तर भाग्य तुमच्या मागे येईल.

बोधवाक्य:- परमात्म पित्याची मुले आहात तर बुद्धी रुपी पाय नेहमी तख्तनशीन असावा.

||| ओम शांती |||

अव्यक्त इशारे:- अशरीरी आणि विदेही स्थितीचा अभ्यास वाढवा.

कोणतेही सेवेचे प्लॅन्स बनवता, भले बनवा, भले विचार करा, परंतु ‘काय होईल!..’ असे आश्चर्यवत् होऊन नको. विदेही, साक्षी होऊन विचार करा. विचार केला, प्लॅन बनवला आणि सेकंदामध्ये प्लेन स्थिती बनवत जा. आता आवश्यकता स्थितीची आहे. ही विदेही स्थिती परिस्थितीला खूप सहज पार करेल. जसे ढग आले आणि निघून गेले. विदेही, अचल-अडोल होऊन खेळ बघत आहोत.